# पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर

मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, औरंगाबाद - ४३१ ००१
दुरध्वनी क्रमांक :- ०२४०-२२४०५९१, फॅक्स क्र. ०२४०-२२४०५९६
ईमेल - cp.aurangabad@mahapolice.gov.in


दि० २/२/२०१९

## प्रेस नोट

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावर बुध्दीमान उमेदवाराची निवड होण्याची आवश्यकता. पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणी दरम्यान होणाऱ्या दुर्घटना याबाबी विचारात घेऊन शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/ प्र.क्र.३१३/पोल-५ अ दिनांक १८/०१/२०१९ व क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५ अ दिनांक १८/०१/२०१९ अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नविन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परिक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलाविण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रिया दिर्घकाळ सुरु न राहता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे जिल्हयाबाहेरील उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत राहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चितच होईल.

**( डॉ.दिपाली धाटे-घाडगे )**
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
औरंगाबाद शहर